आकाशवाणी पुणे

पुणे वृत्तांत

वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.

दिनांक – १५/०६/२०२४ वार – शनिवार

नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी शपथ ग्रहण केल्यानंतर आज ते प्रथम पुण्यात आले. त्यावेळी त्यांचं विमानतळावर स्वागत करण्यासाठी मोठ्या संख्येनं नागरिक जमले होते.

शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवसाचं निमित्त साधून पुण्यातील न्यू इंग्लिश मीडियम शाळेत आज एक अभिनव उपक्रम राबविण्यात आला. दुर्गुण दूर सारून चांगल्या सवयी अंगीकारण्याचं दान विद्यार्थ्यांनी वासुदेवाला दिलं. मोबाईलचा अतिवापर करणार नाही, निकृष्ट अन्न खाणार नाही, प्लास्टिक साहित्याचा वापर टाळू, नियमित व्यायाम करू, मैदानी खेळ खेळू, शुभंकरोती म्हणू अशी प्रतिज्ञा करीत पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी वासुदेवाच्या झोळीत दान टाकलं. साईनाथ मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष पियूष शहा यांच्या संकल्पनेतून आयोजित या अनोख्या स्वागत कार्यक्रमामुळं विद्यार्थ्यांसह पालकही हरखून गेले. नवीन परमार यांनी 'वासुदेव आला हो वासुदेव आला', 'दान पावलं देवा दान पावलं' असा गजर करत वासुदेवाच्या भूमिकेतून विद्यार्थ्यांकडं चांगल्या वागणुकीचं दान मागितलं; तर लोककलावंत लक्ष्मण जाधव या पोतराजानं आसूडानं स्वत:ला फटके मारीत विद्यार्थ्यांमधील दुर्गुण दूर व्हावेत यासाठी प्रार्थना केली.

कौटुंबिक स्तरावर ज्येष्ठांच्या छळाच्या घटना अलिकडे वाढत आहेत. हे दुःखद असलं तरी दाहक वास्तव आहे. ज्येष्ठांचा कौटुंबिक आणि सामाजिक स्तरावरील छळ हा कायद्याच्या चौकटीत सायलेंट क्राईम या वर्गवारीत येतो, असं मत निवृत्त पोलीस आयुक्त जयंत उमराणीकर यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. जागतिक ज्येष्ठ नागरिक छळ प्रतिबंध जनजागृती दिनानिमित्त विविध संस्थांच्या वतीनं निवारा वृध्दाश्रमात आयोजित विशेष कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाची महाराष्ट्र उर्जा विकास संस्था आणि इरफिन्डेड टेक्नोलॉजी यांच्यादरम्यान हायड्रोजन निर्मिती प्रकल्पासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या प्रकल्पामध्ये प्रतिदिन सातशे किलो कृषी अवशेष आणि शहरी घनकचरा वापरून हायड्रोजन तयार करून त्यापासून वीज निर्मिती केली जाणार आहे.

ग्राम बीजोत्पादन संकल्पनेच्या अंतर्गत पुणे जिल्ह्यामध्ये सोयाबीनचं घरगुती ३७ हजार ५४७ क्विंटल खातरीशीर बियाणं सध्या शेतकऱ्यांकडे उपलब्ध आहे. मागील दोन वर्षात पेरणी केलेल्या प्रमाणित बियाण्यांपासून उत्पादित होणारं सोयबीन हे बियाणं म्हणून शेतकऱ्यांनी वापरल्यास उत्पादन खर्च कमी होऊ शकतो, अशी माहिती पुणे जिल्हा कृषी अधीक्षक संजय काचोळे यांनी दिली. या अनुषंगानं सोयाबीन बियाणं वापराबाबत शेतकऱ्यांना वेळोवेळी कृषी विभागाच्या वतीनं आवाहन केलं होतं.

घाऊक बाजारातील साखरेच्या किमान विक्री दरात वाढ झाल्यास त्याचा थेट परिणाम किरकोळ बाजारातील साखरेच्या दरावर होण्याची शक्यता या क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघानं पुण्यातील बैठकीत साखरेच्या किमान विक्री दरात ४२ रुपयांपर्यंत वाढ करण्याची मागणी केली आहे. सध्या हा दर ३१ रुपये प्रतिकिलो आहे. मात्र किरकोळ बाजारात सर्वसामान्य नागरिकांना साखर प्रतिकिलो ४० ते ४५ रुपये दरानंच उपलब्ध होत आहे. साखर कारखाना महासंघानं मात्र आपल्या निर्णयाचं समर्थन करताना खुल्या बाजारात विक्रीसाठी येणाऱ्या एकंदर साखरेपैकी केवळ १४ ते १६ टक्के साखर घरगुती ग्राहकांकडून खरेदी केली जाते, उर्वरित साखरेचा व्यावसायिक वापर होतो, असं स्पष्ट केलं आहे.

भारतीय लष्कराच्या दक्षिण कमांड मुख्यालयाद्वारे काल स्वावलंबनातून शक्ती: भारताची नवी दिशा” या विषयावर चर्चासत्राचं आयोजन केलं होतं. आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया उपक्रमांशी सुसंगत हा कार्यक्रम संरक्षण उत्पादनात स्वयंपूर्णता वाढवण्याच्या उद्देशानं आयोजित करण्यात आला. भारतातील एक भक्कम, स्वावलंबी संरक्षण क्षेत्रासाठी धोरणं आणि सहकार्यावर चर्चा करण्यासाठी सशस्त्र सेवा, संरक्षण उद्योग आणि शैक्षणिक प्रतिनिधींसह विविध तज्ञांनी या विषयावर आपले विचार मांडले.

पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालय आणि पोलीस प्रशासनाच्या सहकार्यानं अपघातमुक्त वारी संकल्प करण्यात येणार असल्याची माहिती पुणे प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी दिली. पालखी सोहोळयात दरवर्षी दिंड्यांमध्ये वाहन शिरून अपघात यासारख्या घटना घडतात. त्या पार्श्वभूमीवर पुणे आरटीओनं ठोस पावलं उचलत पुणे पोलीस प्रशासनाच्या सहकार्यानं अपघातमुक्त वारीचा संकल्प केला आहे.

पिंपरी चिंचवड शहरात कीटकजन्य आजारांना आळा घालण्यासाठी  विविध उपाययोजना करण्यात येत असून समाजातील सर्वच घटकांनी डासांची उत्पत्ती ठिकाणं तत्काळ नष्ट करावीत, अन्यथा कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे. पाणी साठणाऱ्या भागांची तपासणी करून संबंधितांना नोटीसा बजावण्यात येत आहेत. शिवाय अशी ठिकाणं आढळून आलेल्या आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. डेंगूच्या तपासणीकरिता जलद चाचणी संच उपलब्ध करून देण्यात आला असल्याचं महापालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर लक्ष्मण गोखले यांनी सांगितलं.

तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.